धर्मप्रांतीय उपासना आयोग,
वसई

# पेन्टेकॉस्ट सणाच्या पूर्वतयारीसाठी नोव्हेना प्रार्थना



हे माझ्या प्रभो, पवित्र आत्म्या | आम्ही तुला नमन करतो | आम्ही तुझ्याशिवाय काहीही करू शकत नाहीत | हे तुझ्या दैवी उपस्थितीत | आम्ही मान्य करतो . | हे पवित्र आत्म्या | महान कैवारी | तू गरीबांचा पिता आहेस . | तू उत्तम सांत्वनकर्ता आहेस . | आमचा तारणारा येशूख्रिस्त | ह्याने आश्वासन दिले होते की | मी तुम्हास अनाथ असे सोडणार नाही . | हे पवित्र आत्म्या | आम्ही परमेश्वराच्या प्रेमास अपात्र आहोत . | तू येशूची आई मरिया | व पहिल्या शिष्यांवर | पेन्टेकॉस्टच्या दिवशी अवतरलास | व त्यांना तुझ्या दानांनी भरलेस ! | हे पवित्र आत्म्या | त्याच दयेने व दानशूरतेने | त्या दानांचा आम्हावर वर्षाव कर . | आमच्या अंतःकरणात | तुला पसंत नसलेले | असे सर्व नष्ट कर | व त्यात येऊन तू वस्ती कर . | आमच्या शाश्वत चांगुलपणासाठी असलेल्या गोष्टी | आम्हाला स्पष्ट दिसाव्यात | व समजाव्यात | म्हणून आमचे मन | तुझ्या दैवी प्रकाशाने उल्हासित कर . | हे पवित्र आत्म्या | आमचे अंतःकरण तुझ्या शुद्ध प्रेमाने भर . | विविध बंधनात जखडून ठेवणा-या आसक्ती | आमच्या हृदयातून काढून टाक . | आम्हाला येशूच्या प्रेमाने भर . | परमेश्वरी इच्छेला आमच्या जीवनात प्राधान्य असावे | म्हणून पवित्र आशा-आकांक्षांनी जगण्यास | आम्हाला प्रेरणा दे . नम्रता, विरक्ती, आज्ञाधारकपणा | व ऐहिक जगाच्या मोहापासून | दूर राहण्याचा | प्रभू येशूने घालून दिलेला आदर्श | आमच्या जीवनात व कृतीत उतरविण्यास | आम्हाला कृपा दे . आमेन .

आमच्या स्वर्गीय बापा .... नमो मरिया . .